**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार

दि.२९ मे ते २ जुन २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.

संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

मूल्य २.००

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२३२ ■ मंगळवार २६ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

॥ श्री गणेशाय नमः ॥

कुणाल वधवा 9765595037 9405171771

**श्रीराम बोरवेल्स**



जमीन, घर, शेती यावर ४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल. तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.

१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## बेदरकार डंपर विरुद्ध बाजूच्या ट्रकवर धडकला ट्रॅव्हल्सची नंतर धडक : सहा ठार, पंचवीस जखमी





**धुळे, दि. २५ - मुंबई-आग्रा महामार्गावरील लळिंग (ता.धुळे) घाटात आज पहाटे झालेल्या भीषण विचित्र अपघातात सहा जण ठार, तर २६ जण जखमी झाले. वाळू भरलेल्या डंपरने एका विरुद्ध बाजूने येणाऱ्या ट्रकला समोरासमोर धडकला. यावेळी तेथे मदतकार्य सुरु असतांनाच भरधाव येणारी ट्रॅव्हल्स अपघातग्रस्त वाहनांवर जोरदार धडकली. या विचित्र भिषण अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये टोल नाक्यावरील एका कर्मचाऱ्याचाही समावेश आहे. पंचवीस जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातात तीनही वाहनांच्या शोचा चक्काचूर झाला असून त्यावरूनच अपघाताची भीषणता दिसून येते.**

बेदरकारपणे लळिंग घाटातून जाणाऱ्या वाळू भरलेला डंपर (एमएच४१/एयु२४९५) चालकाचे नियंत्रण सुटले. यामुळे डंपर विरुद्ध बाजुला गेला. त्याचवेळी समोरून येणाऱ्या एक ट्रक (एमएच१२/एम१२७०) आणि डंपरची धडक झाली. या अपघाताची माहिती मिळताच लळिंग टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी त्वरीत मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. ट्रक व डंपर मधील जखमींना बाहेर काढण्याची मदत कार्य सुरू होते. त्याचवेळी मालेगावकडून येणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सने (एबी११/डी८५८५) अपघातग्रस्त ट्रकला मागून जोरदार धडक दिली, धडक इतकी भीषण (पान ४ वर)

## पोलिस मुख्यालयात स्फोट चार प्रशिक्षणार्थी जखमी

अहिल्यानगर, दि. २५ : येथील पोलिस मुख्यालयात सुरू असलेल्या प्रशिक्षण दरम्यान सोमवारी सकाळी दुर्घटना घडली. पोलिस कर्मचा-यांना हँडग्रेनेड हाताळण्याचे प्रात्यक्षिक दिले जात असताना अचानक ग्रेनेडचा स्फोट झाला. या भीषण अपघातात चार प्रशिक्षणार्थी पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर नियमित प्रशिक्षण सुरू होते. यावेळी प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना स्मोक हँडग्रेनेड कसे वापरायचे आणि त्याची हाताळणी कशी करायची, याबाबत मार्गदर्शन केले जात होते. प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सुरू असतानाच अचानक संबंधित ग्रेनेडचा हातातच स्फोट झाला. हा स्फोट इतका जोरदार होता की परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी (पान ४ वर)

## पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीतून जनतेची फक्त लुट सरकारच्या विरोधात काँग्रेसचे आजपासून आंदोलन

**मुंबई, दि. २५ : सत्तेत आल्यावर पस्तीस रुपये लिटरने पेट्रोल-डिझेल देऊ, अशा वल्गना करणारे सत्तेत आले. पण, ते सत्तेत आल्यापासून पेट्रोल- डिझेल- एलपीजी सिलेंडरच्या किंमती गगमाला भिडल्या आहेत. मागील अकरा दिवसातच पेट्रोल डिझेलच्या किंमती आठ रुपये प्रति लिटरने वाढवलेल्या आहेत. इराण युद्धाच्या नावाखाली केलेली ही दरवाढ आधीच महागाईने पिचलेल्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. ही दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या खिशावर दरोडा टाकणारी असून ती सरकारने तात्काळ मागे घ्यावी. महागाई नियंत्रणात ठेवता येत नसेल तर नरेंद्र मोदींनी खुर्ची सोडावी, अशी टीका करताना या दरवाढीविरोधात उद्या (२६ मे) पासून प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करण्यात येईल, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.**



इंधन दरवाढीवरून सरकारचा समाचार घेताना हर्षवर्धन सपकाळ यांनी, इराण युद्धाचे नाव पुढे करून केलेली दरवाढ ही दिशाभूल करणारी असल्याचा आरोप केला आहे. गेल्या बारा वर्षांत नरेंद्र मोदी सरकारने, पेट्रोलच्या किमती अडतीस टक्क्यांनी तर डिझेलच्या किमती बासष्ट टक्क्यांनी वाढवल्या आहेत. त्यावेळी तर इराण इस्त्राईलचे युद्ध नव्हते. पेट्रोल-डिझेलच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारातील क्रूड ऑईलच्या दरानुसार ठरतात, हे सर्वांनाच माहित आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारच्या कार्यकाळात कच्च्या तेलाचे दर शंभर डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचले असतानाही पेट्रोल आणि डिझेलच्या किमती बहात्तर रुपये लिटरच्यावर जाऊ दिल्या नाहीत.

महागाईचा भार डॉ. मनमोहनसिंह यांनी जनतेवर पडू दिला नाही. पण, मोदी सरकारच्या काळात कच्च्या तेलाचा भाव ५०-५५ डॉलर्स प्रति बॅरलच्या आसपास रेंगाळत होता. तेव्हाही पेट्रोल शंभरच्या आसपास विकले जात होते. आतातर नरेंद्र मोदी सरकार इथेनॉलमिश्रित निकृष्ट दर्जाचे पेट्रोल ११० रुपये प्रति लिटर दराने विकत आहे. गेल्या बारा वर्षांत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने (पान ४ वर)

## आता नवतप सुरू झाला, नऊ दिवस उष्णलाट पारा अठ्ठेचाळीस अंशापर्यंत जाण्याची शक्यता

**मुंबई, दि. २५ - गेल्या पंधरा दिवसांपासून राज्यघरातील अनेक भागांमध्ये तापमानाचा पारा प्रचंड वाढलेला असताना आजपासून नवतप सुरू होणार आहे. नवतप म्हणजे उन्हाळ्यातील सर्वात उष्ण नऊ दिवस. हे नऊ दिवस सूर्य पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. त्यामुळे तीव्र सूर्यप्रकाश आणि उष्ण वाऱ्यांनी टोक गाठलेले असते. नवतप आजपासून म्हणजेच २५ मे ते २ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, उत्तर व पश्चिम भारतातील अनेक**



**भागांमध्ये कमाल तापमानाचा पारा ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकतो. तर २८ ते ३० मे दरम्यान या भागांमध्ये तीव्र वादळाचाही इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रामध्ये विदर्भात २५ ते ३० मे पर्यंत उष्णतेच्या लाटा कायम राहणार आहेत. नवतपच्या काळात महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा चढाच राहणार आहे.**

### नवतप का पडतो?

हिंदू पंचांगानुसार सुर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो त्यावेळी नवतप सुरू होतो. या काळात तापमानाचा पारा ४५ ते ५२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढू शकतो. विज्ञानानुसार या काळात सूर्य कर्क रेषेजवळ आलेला असतो. परिणामी सूर्यकिरणे थेट पृथ्वीवर पडतात आणि प्रचंड उष्णता वाढते. दरवर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आणि जूनच्या सुरुवातीला हा काळ नागरिकांना सोसावा लागतो. या दिवसात दुपारच्या (पान ४ वर)

## गोवंश हत्या.कायद्याचे पालन करा- वि.हिं.प.

धुळे, दि.२५- राज्यातील गोवंश हत्या बंदी कायद्याच्या कडक अंमलबजावणीसाठी गृह विभागाने जारी केलेल्या नवीन शासनादेशाचे काटेकोर पालन व अवैध वाहतूक आणि कत्तल करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे. या मागणीचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षकांना विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दिले.

निवेदनात नमुद केले आहे की, पोलीसांच्या डोळ्यात धूळ फेकून छुप्या मार्गाने गोवंशाची अवैध वाहतूक आणि कत्तल केली जात असल्याचे समोर येत आहे. राज्यातील प्राणी कल्याण कायदा पायदळी तुडवले जात आहेत. दि.२१ मे २०२६ रोजीच्या शासनाच्या नवीन (पान २ वर)

## शासकीय धान्य गोदामातील हमालांचे काम व रोजगार अबाधित ठेवा मागणी



**धुळे, दि.२५ - राज्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये कार्यरत असलेल्या हमाल कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला असून, नव्या शासन परिपत्रकामुळे हजारो हमाल कामगार बेरोजगार होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित विभागाकडे निवेदन देऊन काम व रोजगार अबाधित ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, दि. २१ व २४ एप्रिल २०२६ रोजी वाहतूक व हाताळणी कामांसाठी शासनाने नवीन परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे राज्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये माथाडी मंडळाकडे नोंद असलेल्या सुमारे दहा हजार हमाल कामगारांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हमाल कामगारांच्या वतीने शासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये शासकीय धान्य गोदामांतील हाताळणी व वाहतूक कामे माथाडी मंडळातील नोंदित हमाल कामगारांकडूनच करून घ्यावीत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार गोदामातील मजुरी व लेव्हीची रक्कम माथाडी मंडळात जमा करावी, थकीत मजुरी तात्काळ अदा करावी, महागाई निर्देशांकानुसार फरक व वाढ द्यावी आणि हमालांना नागरी सुविधा उपलब्ध करून (पान २ वर)

## कौटुंबिक वाद विकोप्यास स्वत:सह चार मुले संपवले

बुलडाणा, दि. २५ : राजुरा शिवारात एका पित्याने आपल्या चार मुला-मुलींना विहिरीत फेकून स्वत:ही उडी घेत आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना आज उघडकीस आली. या घटनेत पित्यांसह दोन मुले आणि दोन मुली अशा पाच जणांचा मृत्यू झाला असून परिसरात अस्वस्थचा पसरून हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय मुसा किराडीया (२७, रा. राजुरा ग्रामपंचायत उमापूर) यांनी घरगुती वादातून टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. त्यांनी आपल्या प्रीत (७), प्राची (५), पूर्वी (३) व पीयूष (पान २ वर)



### वारकरी भवनाला जागा देणार : आ.अग्रवाल

## दिंडोरीचे विश्वनाथजी महाराज कोल्हेंना कान्हादेश वारकरी भुषण पुरस्कार

**धुळे, दि.२५ - कान्हादेश वारकरी सेवा मंडळ, धुळे यांच्या वतीने आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह व पुरस्कार प्रदान सोहळा हा धार्मिक व सांस्कृतिक सोहळा प्रसन्न हनुमान मंदिर, पवन नगर, प्रीती सुधाजी हायस्कूलजवळ, कॉटन मार्केट मागे येथे मोठ्या उत्साहात पार पडला.**

दि. १६ मे २०२६ पासून सुरू झालेल्या या सप्ताहात हरिपाठ, कीर्तन, प्रवचन, (पान ४ वर)

## तेली समाज मंडळाचा सारथी पुरस्कार वितरण खान्देशातील नगरसेवकांना देऊन केला सन्मान

**धुळे, दि.२५ - तेली समाजातील महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त खान्देश तेली समाज मंडळाच्या वतीने दर पाच वर्षांनी देण्यात येणारा मानाचा समाज सारथी पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २४ मे रोजी सकाळी दहा वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराज नाट्य मंदिर,धुळे या ठिकाणी संपन्न झाला.**



या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये पहिल्यांदाच उत्तर महाराष्ट्रातील नव्याने निवडून आलेल्या सर्व पन्नास हून अधिक नगरसेवकांचा सन्मान सोहळा देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. धुळे, जळगाव, नंदुरबार व नाशिक जिल्ह्यातील तेली समाजातील निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांना एकत्र आणून त्यांचा सन्मान करण्याची ही समाजातील पहिलीच वेळ असून या अभूतपूर्व होणाऱ्या सोहळ्यासाठी धुळे शहरातील आमदार अनुप अग्रवाल,समाजाचे माजी आमदार शिरीषदादा चौधरी,मा.शिक्षण सभापती संदीप महाले, म्हाडाचे माजी सभापती बबन भाऊ चौधरी, गुरु शिष्य स्मारक समितीचे (पान ४ वर)

## खान्देशची अहिराणी गुगल की बोर्डवर

साक्री, दि.२५ (प्रतिनिधी)- खान्देशची अस्मिता मानली जाणारी अहिराणी भाषा आता जागतिक स्तरावर अधिक ठळकपणे ओळखली जाऊ लागली आहे. गुगलच्या ट्रान्सलेट आणि व्हॉइस टायपिंग सोबतच युनेस्कोने सुद्धा अगोदरच अहिराणी भाषेला इंडो-आर्यन भाषागटामध्ये समावेश केल्याची महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. अहिराणी ही खान्देशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा आणि कृषी संस्कारांशी जोडलेली समृद्ध बोलीभाषा आहे. अनेक वर्षांपासून साहित्यिक, संशोधक, कवी, सामाजिक (पान २ वर)

## आगामी काळात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नायक कारभारी परिषद - श्रावण चव्हाण

**नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी) - अखिल भारतीय बंजारा क्रांती दलाची खानदेश विभागीय बैठक नंदुरबार येथे पार पडली. या बैठकीत आगामी काळात मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत नायक कारभारी परिषद आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय अध्यक्ष श्रावण चव्हाण यांनी दिली.**

नंदुरबार येथील कोकणी हिल परिसरात आयोजित बैठकीस जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी चेतनराम महाराज होते.

यावेळी बोलताना श्रावण चव्हाण यांनी सांगितले की, बंजारा व लमाण समाजातील नायक, कारभारी, भजनकरी, पुजारी, लेखक व साहित्यिक यांना एकत्र आणण्यासाठी भव्य परिषद आयोजित केली जाणार आहे. या परिषदेला राज्यातील महत्त्वाचे नेते व मंत्री उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले. परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, (पान ४ वर)

## नीट पेपरफुटीच्या दोषींवर कारवाई करा - काँग्रेस

शिरपूर दि.२५ (का.प्र.): वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सर्वाधिक महत्त्वाची मानली जाणाऱ्या नीट परीक्षेत पेपर फोडणाऱ्या संशयितांवर कठोर कारवाई करावी, पेट्रोल पंपावरुन शेतकऱ्यांना ड्रममध्ये डिझेल घेऊन जाण्यासाठी परवानगी द्यावी अशा मागण्यांसाठी युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी २५ मे रोजी प्रशासनाला निवेदन दिले. निवेदन देतांना युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गेंद्या पावरा, सायसिंह पावरा, सोनू पावरा, भियासिंह पावरा, मुकेश पावरा, रवींद्र पावरा, विलास पावरा, ॲड.गोपालसिंह राजपूत, मोहन पाटील, शिवाजी पावरा, जुनेद पठाण, ॲड.विजय तिवारी आदि उपस्थित होते.

## अ.भा.अग्रवाल संघ.ची इंदूरला बैठक समाजहिताच्या प्रश्नांवर चर्चा - मित्तल

**धुळे, दि.२५ - अखिल भारतीय अग्रवाल संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची दोनदिवसीय बैठक मध्य प्रदेशातील इंदूर येथे होत आहे. येत्या ३० व ३१ मेस होणाऱ्यायामहत्त्वाच्या बैठकीत समाजहिताच्या विविध विषयांवर चर्चा होणार असून, बैठकीत अखिल भारतीय अग्रवाल संघटनेचे देशभरातील प्रदेशाध्यक्ष, प्रदेश महामंत्री, राष्ट्रीय पदाधिकारी, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तसेच विविध आमंत्रित सदस्य सहभागी होणार आहेत, अशी माहिती संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष विनोद मित्तल यांनी दिली.**



श्री. मित्तल यांनी याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, की राष्ट्रीय कार्यकारिणीची दोनदिवसीय बैठकीत समाजहिताशी संबंधित विविध विषयांवर सखोल चर्चा करून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाणार आहेत. तसेच आगामी काळात संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमांची रूपरेषाही निश्चित करण्यात येणार आहे. अग्रवाल समाजाच्या राजकीय सहभागाबाबतही बैठकीत गांभीर्याने चर्चा केली जाणार आहे. सध्या समाजासमोरील विविध समस्या वाढत असून, त्यावर विचारमंथन करून योग्य दिशा देण्याचे कार्य या बैठकीतून केले जाणार आहे. महाराष्ट्र राज्य (पान २ वर)

## विजेच्या धक्याने शिरपूरला एक ठार

शिरपूर दि.२५ (का.प्र.) : येथील अजिंठा फोटो स्टुडिओचे संचालक मनीष किशोर भावसार (वय ४९, रा.सुभाष कॉलनी) यांचा विजेचा धक्का बसल्यामुळे मृत्यू झाला. ही घटना २४ मेस सायंकाळी शहरातील मेनरोडलगत राम कॉम्प्लेक्सच्या टेरेसवर घडली. इंटरनेटची केबल तुटल्याने ती तपासण्यासाठी ते राम कॉम्प्लेक्सच्या इमारतीच्या छतावर गेले होते. तेथील वीज वाहक तारेचा स्पर्श झाल्यामुळे विजेचा धक्का लागून ते बेशुद्ध झाले. त्यांना येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत त्यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले.

## अवधान येथे अनैतिक संबंधांचा बळी मुडावदला आरोपी दिनेश वेंदेला अटक

**धुळे, दि.२५ - अवधान येथील एका तरुणाच्या पोटात चाकूने भोसकून खून केल्याची घटना मध्यरात्री घडली. अनैतिक संबंधांच्या वादातून घटना घडल्याची चर्चा आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. मोहाडी पोलीसांनी पाहणी केल्यानंतर मारेकऱ्यास शिंदखेडा तालुक्यातील मुडावद येथून ताब्यात घेतले.**

किशोर वसंत धापटे (वय ३५) असे मृताचे नाव आहे. आई रेखाबाई धापटे यांचेसह अवधान येथील निंबा नगर निवासस्थान आहे. दोन्ही माय लेक एमआयडीसी मधील सुग्रीम कंपनीत कामाला आहेत.

दरम्यान, शनिवारी रात्री (ता. २४) एमआयडीसीतून कामावरुन परतल्यावर किशोर धापटे हा घरात झोपला होता. तर त्याची आई घराबाहेर झोपलेली होती. मध्यरात्रीनंतर तीनच्या सुमारास घराजवळील राजू भिल, वाल्मिक भिल, भय्या भिल यांनी किशोरच्या आईला उठविले. किशोर वानर देव चौकात जखमी अवस्थेत पडला असल्याचे सांगितले. आई रेखाबाईंनी आरडाओरड करीत घटनास्थळी धाव घेतली. किशोरच्या पोटातून रक्त निघत असल्याने त्याला श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. त्यास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.



मोहाडी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. चाकूने भोसकून खून केल्याचे दिसून आढळले.याप्रकरणी रेखाबाई धापटे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयीत दिनेश प्रदीप वेंदे (रा.निंबा नगर, अवधान) याच्याविरुध्द खुनाचा गुन्हा दाखल झाला. किशोर हा (पान २ वर)

## धुळे, नंदुरबार जिल्हा ग.स. बँकेतर्फे वर्गणी व्याज वाटप

धुळे, दि.२५- धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँक लि.च्या सभासदांना जमा वर्गणी वरील व्याज देण्यास सुरूवात झाली आहे. सभासदांनी वर्गणी व्याजाचा लाभ घ्यावा. असे आवाहन बँकेचे कार्यकारी अधिकारी भारत भामरे यांनी केले आहे. बँकेचे गटनेते निशांत रंधे, चेअरमन किरण बोरसे, व्हा.चेअरमन सोनाली भामरे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, बँकेच्या सभासदांना ज्यांच्या जमा वर्गणीवरील व्याजाचे वाटप २५ मे पासून वाटप करण्यात येत आहे. ज्या सभासदांची केवायसी अपूर्ण असेल त्यांनी ती विनाविलंब त्याची पूर्तता करून वर्गणी व्याज ज्या-त्या शाखेतून घ्यावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,42,850 रु.+3% GST

सोने- 24 K -1,56,000 रु.+3% GST

चांदी- 2,67,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३

**सेंद्रिय जांभुळ**



संकेत नित्या फार्मचे उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ उपलब्ध

✻ संपर्क ✻

वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत

दै.आपला महाराष्ट्र कार्यालय

वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

## पाच कंदिल जवळील फळ मार्केट पाडले; मनपाकडून कामाला वेग

**धुळे, दि.२५- शहरातील मुख्य बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या पाचकंदील परिसरातील चारही मार्केट पाडून त्याठिकाणी नवीन व्यापारी संकुलीची उभारणी करण्याच्या कामाला मंजुरी मिळाल्याने सुरूतीला भाजी मार्केट पाडण्यात आले. महापालिकेने फळ मार्केटही जमिनदोस्त करून संकुलाच्या उभारणी कामाला गती दिली आहे.**



शहराचे आ. अनुप अग्रवाल यांनी पाचकंदिल परिसरातील चारही मार्केट तोडून त्याठिकाणी नव्याने सर्व सोयींनी सुसज्ज असे व्यापारी संकूल (पान २ वर)

## स्कॉर्पिओ हजार फुट दरीत कोसळून आठ जणांचा मृत्यु

रायगड, दि.२५ - येथील आंबेनळी घाटात स्कॉर्पिओ कार १२०० फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातामध्ये ८ जणांचा मृत्यू झाला होता. या अपघाताबाबत आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. घाटात दाभिळटोक याठिकाणी अपघात झाला. अपघात शनिवारी रात्री झाला होता. रात्रीच्या अंधारात स्कॉर्पिओ दरीत कोसळल्याचे लक्षात आले नाही. या तरुणांच्या कुटुंबीयांनी रविवारी शोधाशोध सुरु केली. रात्री अकराच्या सुमारास स्कॉर्पिओ कार १२०० फूट खाली दरीत पडल्याचे निदर्शनास आले आणि अपघात झाल्याचे निष्पन्न झाले.

## नीट पेपर फूटीप्रकरणी सखोल तपास करा दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी

**धुळे, दि.२५- वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्वाची असलेली नीट युजी २०२६ परीक्षा पेपरफुटी आणि मोठ्या प्रमाणावर झालेल्या गैरव्यवहारामुळे देशातील बावीस लाखांहुन अधिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले. पेपर फुटीत सहभागी असणाऱ्या सर्वांचा महाराष्ट्र प्रोफेशनल टीसर्च असोसिएशनच्या वतीने निषेध करण्यात आला. तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी खाजगी कोचिंग क्लासेस संचालकांची संघटना, धुळे यांच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.**



नीट परीक्षा पेपर फुटल्याने लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. पेपर फुटीसाठी जबाबदार असलेल्या रॅकेटवर, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर आणि या प्रकरणात सहभागी असणाऱ्या खाजगी क्लासेस चालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करत असून गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी. हे प्रकरण जलदगती न्यायालयात कामकाज व्हावे. केंद्रीय स्तरावर कठोर कायदे करण्यात यावे. अशा अनेक मागण्या निवेदनाच्या माध्यमातून खाजगी कोचिंग क्लासेस संचालकांची संघटना धुळे चे (पान २ वर)

आपला महाराष्ट्र

# एका तपाच्या यशापयशाचा लेखा जोखा

देशातील केंद्र सरकारला आज बारा वर्षे म्हणजे एक तप पूर्ण होत आहे. सरकार पक्ष त्यासंदर्भात महिनाभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन करणार आहे. गेल्या बारा वर्षात देशात काय घडले, सकारात्मक किती घडले आणि नकारात्मक किती घडले याबाबतचा लेखाजोखा मांडणे आवश्यक आहे. सरकारने जे काही चांगले केले असेल त्यासंबंधी समाधान व्यक्त करणे त्याचबरोबर जे काही देशाच्या आणि देशातील जनतेच्या संदर्भात नुकसानकारक घडले असेल तर त्यासंबंधी नापसंती व्यक्त करणे हे वृत्तपत्रे तथा प्रसार माध्यमांचे कामच आहे. तथापि गेल्या बारा वर्षात देशातील तमाम माध्यमांचे मुस्के बांधलेले असून दिवसभर एकाच व्यक्तीचे गुणगान करण्यात माध्यम कर्मी आणि चॅनेल चे मालक शिवाय वृत्तपत्रांचे राष्ट्रीय स्तरावरील मालक कधीच थकत नाहीत असा अनुभव आहे. सुरुवातीच्या काळात जनतेवर या माध्यमांनी मोहिनी घातली नंतर मात्र लोकांच्या लक्षात आले की ही माध्यमे निव्वळ व्यक्ती आणि सरकारची आणि त्यांच्या पक्षाची भाटगिरी करीत आहेत. परिणामी त्यांनी चैनल बघणे बंद केले ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे असंख्य चॅनलच्या टीआरपी मध्ये घट झाली. परंतु त्यांना भरमसाठ पैसा मिळत असल्यामुळे त्याची चिंता ते करीत नाहीत. पुढचा काळ कसा येईल माहिती नाही पण जेव्हा येईल तेव्हा त्यांना रडायला भाडे देऊनही माणसे मिळणार नाहीत एवढे खरे. देशात आणि महाराष्ट्रात गेल्या बारा वर्षात काहीच घडले नाही असे म्हणणे चुकीचे होणार आहे. ज्या मूलभूत पायाभूत सुविधांची उभारणी हवी ती मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. मात्र ज्या ८० कोटी लोकांना पाच किलो मोफत धान्य पुरवठा करण्याची जाहिरात सरकार करते त्याऐंशी कोटी लोकांसाठी या पायाभूत सुविधांचा काय उपयोग आहे असा प्रश्न केल्यास त्याचे उत्तर शून्य येते. कारण मोठमोठे चार पदरी, सहा पदरी महामार्ग, बुलेट ट्रेन असेल किंवा राजधानी, शताब्दी ,वंदे भारत रेल्वे गाड्या असतील समृद्धी महामार्ग, शक्ती महामार्ग, विमानतळे त्याचे विस्तारीकरण यापैकी एकही सुविधा या ८० कोटी पाच किलो धान्य घेणाऱ्या लोकांसाठी नाही. तसेच ती शेतकऱ्यांसाठी देखील नाही. मग विकास कोणाचा झाला तर तो ६० कोटी उच्चवर्गीय आणि मध्यमवर्गीयांचा झाला. व्यावसायिकांचा झाला. ही बारा वर्षाची फलश्रुती म्हणावी काय?

गेल्या बारा वर्षात प्रचंड धार्मिकीकरण, विभाजन वाद, सर्व यंत्रणांचा वापर करून राज्ये काबीज करणे, दुसऱ्यांचे पक्ष फोडणे त्यासाठी अब्जावधी रुपये खर्च करणे ही कामे जोरात झालेली आहेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शासक पक्षाने लपवून ठेवलेला निधी सर्वोच्च न्यायालयाने उजागर केला त्यामुळे लक्षात आले की, या पक्षाकडे संपूर्ण देशातील निवडणुका, राजकीय पक्ष आणि यंत्रणा खरेदी करण्याची ताकद निर्माण झालेली आहे. जो पक्ष नगरपालिकेच्या किंवा महापालिकेच्या निवडणुकीत दिल्लीतून पैसे पाठवितो आणि स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात ठेवण्यासाठी आटापिटा करतो. निवडून येणारे सगळे कथित कार्यकर्ते अंध भक्त म्हणून भूमिका बजावतात आणि वरून आदेश आला की विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या छायाचित्रांना काळे फासतात एवढेच काम त्यांना दिलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोफतप्रचंड भ्रष्टाचार असल्यामुळे न खाऊंगा न खाने दूंगा ही घोषणा हवेतच विरली. प्रचंड महागाई वाढली, सगळ्या वस्तू महागल्या, हातावर पोट भरणारा वर्ग जीवन मरणाच्या सीमारेषावर उभा आहे. शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यास सांगण्यात आले आहे. रासायनिक खतांचा वापर कमी करा असे संदेश खुद्द पंतप्रधान देतात. सोने खरेदी करू नका आणि पेट्रोल डिझेलचा वापर कमी करा, खाद्य तेल कमी खा, ही बारा वर्षाची प्रगतीची लक्षणे आहेत का असा प्रश्न निर्माण होतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाच्या क्षेत्रात भयंकर पडझड झालेली दिसेल. नीती आयोगाच्या अहवालातील निरीक्षणा नुसार देशात २०१४ ते २०२५ या दशक भरात एक लाख शाळा बंद पडल्या त्यात ९४ हजार सरकारी आणि चार हजार सरकारी अनुदानित शाळांचा समावेश आहे त्याचवेळी ५१ हजार खाजगी शाळा वाढल्या मात्र विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशाचे प्रमाण कमी झाले, शिक्षकांची कमतरता आहे. शिक्षणाच्या संदर्भात बारा वर्षात प्रचंड परवड झालेली दिसते. हे आकडे सरकारी आहेत. परराष्ट्र धोरण देखील प्रचंड फसले आहे. त्यामुळे आयात तेलाच्या संदर्भात भयंकर संकट निर्माण झाले. एक महिन्यात तीन वेळा पेट्रोल डिझेल वाढले. महाराष्ट्रात मतदार याद्यांचे पुनरिक्षण करण्यात येणार आहे आणि घुसखोरांचा शोध घेतला जाणार आहे. याचा अर्थ बंगाल मध्ये जे घडले ते महाराष्ट्रात घडणार आहे. या कार्यक्रमावर सरकारचा भयंकर जोर आहे. प्रगती म्हणाल तर ती अशी आहे.

देशभर आणि राज्यातही प्रचंड मंदिरे बांधण्यात आली. सरकारने हा कार्यक्रम हाती घेतला. धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी देशात सरकारचे हे काम नाही. पण या सरकारने प्राधान्य क्रमाने ते हाती घेतले आहे. सरकार पक्ष देशभरातील बाबा बुवांचा प्रवचनांचा कार्यक्रम आयोजित करते. ते काही वाही बोलतात. नुकतेच एक बाबा धुळे शहरात येऊन गेले आणि त्यांनी सांगितले की चातुर्वर्ण देवाने निर्माण केलेले आहेत. संविधानात त्याची चिरफाड करून जाती-जातीत तुकडे करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारची वादग्रस्त वक्तव्य करणारे लोक देशभर फिरतात आणि अंध भक्त त्यांचे कार्यक्रम आयोजित करतात हेच १२ वर्षात झालेले मोठे काम आहे. या पार्श्वभूमीवर

महाराष्ट्राला खरोखर गरज कशाची आहे असा प्रश्न सहज निर्माण होतो. महाराष्ट्राला मठ मंदिरांची गरज आहे की प्रकल्पांची गरज आहे यांचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे .पण यासाठी पुढाकार घेणार कोण करणार कोण? हा प्रश्नच आहे.हेच मापदंड बारा वर्षे पूर्ण करण्यात येत असलेल्या केंद्रातील राजवटी बद्दल लावता येतील.सगळ्या तीर्थस्थळांवर सरकारने खर्च केला.ते सरकारचे काम नाही.नेहरूंनी सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करताना सरकारचा एक रूपया देखील लावता कामा नये.ते काम लोकांनी करावे. असे पत्र सरदार वल्लभभाई पटेल यांना लिहिले होते. ते पत्र आजही सरकार दप्तरी आहे.सरदारांनी नम्रपणे उत्तर देऊन पूर्ण खर्च लोकांकडून देणग्या घेऊन केला जाईल असे नेहरूंना कळविले.तसेच पत्र राष्ट्रपतिंना उद्घाटनाच्या संदर्भात नेहरूंनी लिहिले होते.हा त्या आणि आजच्या राजवटीच्या मधला फरक आहे.या पार्श्वभूमीवर गेल्या बारा वर्षांत जनतेच्या चेहऱ्यावर स्मित उमटेल अशी कोणती गोष्ट या सरकारने केली या प्रश्नाचे उत्तर् नकारार्थी येते.लाडक्या बहिणी सारख्या योजना लोकांना लाचार आणि निष्क्रिय बनविणाऱ्या आहेत.त्या मुलभूत कल्याणाच्या योजना नाहीत.पाच किलोधान्य ऐंशी कोटी लोकांना फुकट वाटप हा प्रगतीचा आलेख होऊ शकत नाही.भांडवलदारांवर अतिरेकी प्रेम व त्यासाठी सर्व वैधानिक यंत्रणांचा गैरवापर करण्यात सरकार मशगुल आहे.पाच राज्यांच्या निवडणुकीत अमाप खर्च ,उधळपट्टी आणि नंतर् लगेचच जनतेला बचतीचे आवाहन.तेल देखील खाऊ नका असे आवाहन युध्दाचे नाव पुढे करून करण्यात आले.म्हणजे बारा वर्षात आपण गरिबीच्या खाईतच लोटले गेलो. आपले परराष्ट्रीय धोरण फसले .पारंपरिक मित्र इराणशी शत्रुत्व महागात पडले.त्या तुलनेत डॉ.मनमोहनसिंग यांची कारकीर्द खूप यशस्वी होती. ते कसलेले राजकारणी नव्हते पण कसलेले् अर्थशास्त्री होते.त्यांनी कठिण काळात देश सावरला.मग आता काय झाले ?रूपया एवढा का हेलपाटला?दरवर्षी वीस हजार औद्योगिक समूह दिवाळखोर होत आहेत. एकही धरण प्रकल्प या कालखंडात झाला नाही. जुन्यांचे ऑडिट झाले नाही.विभाजनवादी कार्यक्रम मात्र जोरात सुरू आहेत.देश मध्ययुगाकडे संस्कृतिच्या नावाखाली नेला जात आहे.हाच बारा वर्षांचा आलेख ठरावा काय ?सरकार तपपूर्ति निमित्ताने हे सगळं सांगणार आहे का ? नाईलाजाने हे सगळे मुद्दे उपस्थित करावे लागत आहेत.स्वाभिमान आणि अस्तित्व दरबारात गहाण ठेवणारा मीडिया यातला एकही प्रश्न उपस्थित करणार नाही.तो फक्त वाहवाच करणार आहे काय ?असाही यानिमित्ताने मुद्दा आहे. एकही धरण प्रकल्प झाला नाही हे वस्तुनिष्ठदृष्ट्या बरोबर नाही असे म्हणणारा वर्ग आहे.पण तो एकाही नव्या धरणाचे नाव सांगू शकणार नाही.महाराष्ट्रात आणि देशात काही सिंचन, जलसंधारण व धरण प्रकल्प पूर्ण झाले किंवा प्रगतिपथावर गेले आहेत. मात्र अपेक्षित प्रमाणात मोठी सार्वजनिक गुंतवणूक या कामावर झालेली नाही.एवढेच नव्हेतर जुन्या धरणांपैकी कुठल्याही धरणाचे ऑडिट झालेले नाही.ऊर्जा प्रकल्प ब-यापैकी झाले .त्यातल्या त्यात सौर, पवन, महामंडळे व खासगी क्षेत्रातील ऊर्जा निर्मिती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.परवाच दारू गोळा कारखान्याचे उदघाटन नगरला झाले.तो प्रकल्प खाजगी आहे आणि संरक्षण क्षेत्र खाजगी क्षेत्राकडे देणे घातक ठरणारे आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. रोजगार निर्माण झाला, पण लोकसंख्येच्या तुलनेत पुरेसा नाही, आणि मोठा भाग असंघटित/कंत्राटी स्वरूपाचा आहे. अशी टीका अर्थतज्ज्ञ करतात.त्यात वास्तव आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी धार्मिक स्थळांच्या विकासावर खर्च केला, पण त्याचबरोबर महामार्ग, मेट्रो, डिजिटल पायाभूत सुविधा, संरक्षण, रेल्वे, विमानतळ यावरही मोठा खर्च झाला आहे. प्रश्न असा आहे की त्या गुंतवणुकीचा सामान्य माणसाच्या जीवनमानावर किती परिणाम झाला तो चिंतेचा विषय म्हणावा लागेल. विकासाची व्याख्या नेमकी काय असावी. याबद्दलचे धोरणच नाही अशी अवस्था आहे..रोजगाराची असुरक्षितता,कृषीक्षेत्रातील संकट,

महागाई,शिक्षण-आरोग्याचा खर्च,आणि मोफत धान्यावर अवलंबित्व या परिस्थितीचा सामना करावा लागत असेल तर सरकारच्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित होणारच आहेत मग सरकारच्या कामगिरीचे मूल्यमापन नेमके कशावर झाले पाहिजे, रोजगार,शिक्षण, सार्वजनिक आरोग्य,पाणी आणि शेती,उद्योगांची निर्मिती,न्याय व इतर संस्थांची स्वायत्तता, सामाजिक सलोखा,सर्व सामान्य माणसाचे उत्पन्न या मुद्यांवर सरकारचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे.पण तसे काही होत नाही.थापा मारण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होते. सार्वजनिक चर्चा जर या मुद्द्यांवरून हटून फक्त प्रतिमा, प्रचार आणि धार्मिक-भावनिक ध्रुवीकरणाभोवती फिरू लागली, तर लोकशाहीची गुणवत्ता कमी होते् ती तशी होत आहे .ही बाब नाकारून चालणार नाही.निष्कर्ष काढतांना संतुलित काढले तरी सरकारला नापासचाच शिक्का बसतो.देश काही व्यक्तिस्तोम माजविण्यासाठीचे साधन होऊ शकत नाही.दुर्दैवाने तसेच होत आहे.

पान १ वरुन

## अ.भा.अग्रवाल संघ.ची इंदूरला बैठक

अग्रवाल संमेलनाचे अध्यक्ष विजयकुमार चौधरी यांनी सांगितले, की संघटनेला अधिक बळकट करण्यासाठी तसेच अग्रवाल समाजाला एकत्रित व संघटित करण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ते म्हणाले, की आगामी काळात हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तराखंड तसेच महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात संघटनेचा विस्तार करण्यावर भर दिला जाणार आहे. यासोबतच विविध राज्यांमध्ये राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठका आयोजित करण्याचे नियोजनही सुरू आहे. दरम्यान, राष्ट्रीय कार्यकारिणीच्या या बैठकीला महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांसह समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वरिष्ठ उपाध्यक्ष मित्तल यांनी केले.

## धान्य गोदामातील हमालांचे काम अबाधित ठेवा

द्याव्यात, अशा मागण्यांचाही समावेश आहे. दरम्यान, शासनाने मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास दि. २७ जून २०२६ पासून जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदामांमधील कामे बेमुदत बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निदर्शने आंदोलनात सहभागी झालेले गंगाधर कोळेकर भागवत चितळकर योगेश त्रिभुवन, सुरेश अहिरे, दिनकर सोनू बागुल, श्याम चांडे, अशोक भील, श्रावण चौधरी पाटील भिकन चौधरी यांच्यासह अनेक हमाल बांधव यावेळी सहभागी झाले होते.

## पाच कंदिल जवळील फळ मार्केट पाडले

उभारणीबाबत सांगितले होते. त्याअनुषंगाने शासनाने पाच कंदिल परिसराच्या पुनर्निर्माण कार्याला मंजुरी दिली. त्यानुसार पाच कंदिल येथील जुने भाजी मार्केट पंधरा दिवस आधी पोलीस बंदोबस्तात पाडण्यात आले. काल महापालिकेने फळ मार्केटही जेसीबी यंत्राच्या सहाय्याने जमिनदोस्त करण्यात आले. पाच कंदिल परिसरात नव्याने मोठे व्यापारी संकुलाला सुरूवातीला व्यापाऱ्यांनी विरोध केला. आता मात्र स्वत:हून जागा रिकाम्या करून दिल्याने मार्केट पाडणे सोयीचे झाले. आता पर्यंत चार पैकी दोन भाजी मार्केट व फळ मार्केट असे दोन मार्केट विकास कामाचा उद्देश समोर ठेवून पाडण्यात आले आहेत.

## कौटुंबिक वाद : स्वत:सह चार मुले संपवले

(दीड वर्ष) या चौघांना विहिरीत टाकून स्वत:ही विहिरीत उडी घेतली. ही घटना २४ मेच्या मध्यरात्री घडल्याचे सांगण्यात येत आहे. आज सकाळी विहिरीत तीन मृतदेह तरंगताना काही ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच जळगाव जामोद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पाचही मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. पती-पत्नीच्या वादातून ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## गोवंश हत्या.कायद्याचे पालन करा- वि.हिं.प.

परिपत्रकानुसार राज्यातील सर्व पोलीस प्रशासनाला गोवंश संरक्षण कायद्याची अत्यंक कडक अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. गृह शाखेच्या नवीन परिपत्रकाप्रमाणे सर्व पोलीस स्टेशनला गोवंश हत्या बंदी आणि अवैध वाहतुक आणि कत्तल करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश द्यावेत. अशी मागणी विश्व हिंदू परिषदेचे निलेश रूणवाल, योगीराज मराठे, रोहित विभांडीक, हेमंत कचवे, सुरेंद्र काकडे, गणेश डापसे यांनी केली आहे.

## नीट पेपर फूटीप्रकरणी सखोल तपास करा

प्रा.डॉ.संजय कदम, चिंधू लोहार, शशिकांत देवरे, विजय जाधव, रवींद्र चौधरी, चंद्रकांत शिंपी, संतोष बाविस्कर, अभिजीत सनेर, गिरीष साळुंखे, नरेंद्र महाले, दिपक सोनवणे, डॉ.विलास बडगुजर, कपिल बोरसे, प्रा.रोशन जाधव, प्रा.भुषण खैरनार, प्रशांत पाटील यांनी केली आहे.

## अवधान येथे अनैतिक संबंधांचा बळी

विवाहित असून त्याला एक मुलगा, मुलगी आहे. गेल्या १० वर्षापासून किशोर धापटे याचे याच परिसरात राहणाऱ्या एका महिलेसोबत प्रेमसंबंध होते. त्या वादातून खून झाल्याचे प्राथमिक चौकशीत उघडकीस आले आहे.

## खान्देशची अहिराणी गुगल की बोर्डवर

संस्था आणि भाषा संवर्धकांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांना आता जागतिक स्तरावर मान्यता मिळू लागली आहे. गुगलवर अहिराणी भाषेचा पर्याय उपलब्ध झाल्यामुळे आता अहिराणीमध्ये सहज टायपिंग, भाषांतर आणि डिजिटल माध्यमातून संवाद साधणे अधिक सुलभ झाले आहे. त्यामुळे नव्या पिढीपर्यंत अहिराणी भाषेचा वारसा पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे असे जागतिक अहिराणी भाषा संवर्धन परिषद अध्यक्ष विकास पाटील यांनी सांगितले. अहिराणी भाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या विविध संघटना, साहित्यिक आणि अभ्यासकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, ही खान्देशच्या सांस्कृतिक इतिहासासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना जागतीक अहिराणी भाषा संवर्धन परिषदचे कार्याध्यक्ष प्राचार्य प्रशांत पाटील, सचिव प्रमोद कुवर, अर्जुन पाटील, प्रकाश माळी यांनी व्यक्त केली आहे.



# धुळे एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकीच्या मेकॅनिकल विभागाची प्लेसमेंटमध्ये उत्तम कामगिरी

**धुळे, दि.२५ - धुळे येथील एस.व्ही.के.एम.अभियांत्रिकी महाविद्यालयामधील मेकॅनिकल अभियांत्रिकी (एनबीए मान्यताप्राप्त) विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी यंदाच्या कॅम्पस प्लेसमेंट प्रक्रियेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**

सर्व विद्यार्थ्यांना झायडस, बी-ऑन, दाना, कारगील, इंजिनिअरिंग टेक्नीक, हाय-फॅब, रिइन्व्हेन्ट डिसाईन, सिंटेरकॉम, आराध्या डिसाईन, ब्रेनमाईन एआय, जे.बी.एम ग्रुप यांसारख्या विविध नामांकित कंपन्यांकडून एकूण नोकरीच्या ऑफर्स प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागाच्या कार्याची आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनत, सातत्य आणि कौशल्याच्या जोरावर हे यश मिळवले असून महाविद्यालयासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

विशेष म्हणजे, दर्शन शिंदे या विद्यार्थ्याला झायडस, कारगील व अन्यालायझर या तिन कंपनी कडून ऑफर्स मिळाल्या असून अष्मिका बाविस्कर, पूर्वा कापडे, अक्षदा देशमुख, कुणाल पाटील, रोहित हिरे, रोनित नवगिरे, गौरव पाटील, हर्षल चौधरी, हितेश शिरुडे, कीर्तीज्ञ बागुल, मोहित पाटील, परेश चौधरी, प्रतीक पाटील, प्रतीक वाघ, सिद्धेश महाजन, उदय पाटील, कुणाल सोनावणे, सिद्धेश बोरसे, चिरायु नागरे, हर्षराज शिंदे, सचिन अहिरे या विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन नोकरीच्या ऑफर्स प्राप्त झाल्या आहेत.

यासोबतच अनुजा मोरे, उदय देसले, प्रथमेश बडगुजर, रवींद्र बोरसे, प्रेमराज पाटील, तनिषा पाटील, भूमिका पाटील, मनीष पाटील, रचना बरडे, प्राची शिरसाठ, दुर्गेश खैरनार, नेहा माळी, धनश्री पाटील, ललित कदम, प्रशांत पाटील, तेजस कलाल, पूनम गिरासे, सिद्धेश बागुल, मानस कुलकर्णी, शशिकांत गांगुर्डे, वैभव गुरव, गुंजन देवरे, जयेश पटेल, निकिता शिंदे, देवयानी पाटील, तेजस पाटील, नेहा पाटील, सक्हो शिरुडे, दिया साळुंके या विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक नोकरीची ऑफर्स प्राप्त झाली आहे.

मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागामार्फत विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्राच्या आवश्यकतेनुसार सक्षम करण्यासाठी नियमितपणे तांत्रिक प्रशिक्षण, कार्यशाळा, मार्गदर्शन सत्रे तसेच सराव चाचण्यांचे आयोजन करण्यात येते. या सातत्यपूर्ण उपक्रमांचा सकारात्मक परिणाम म्हणूनच विद्यार्थ्यांना हे यश प्राप्त झाले, असे प्राचार्य डॉ. निलेश साळुंखे यांनी नमूद केले. विभागप्रमुख डॉ. हितेश ठाकरे आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. करण शर्मा, समन्वयक प्रा. सतीश पाटील, विभागातील सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून पालक आणि शिक्षकांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशा बद्दल एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटी चान्सलर सौ. सक्हो पारेख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, मार्गदर्शक डॉ.अजय पसारी, प्राचार्य डॉ. निलेश साळुंखे, सर्व संचालक यांनी कौतुक केले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँका, पतसंस्था व वित्तीय संस्था तसेच सर्व हित संबंधीतांना सदरहू जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

तु. जि. धुळे, पो. तु. ता. धुळे पैकी मौजे धुळे येथील म. न. पा. हद्दीतील प्लॉट मिळकत स. नं. ४८८/१-३ पैकी प्लॉट नं. ५, सि. स. नं. ९७४९ क्षेत्र १६५ चौ. मी. त्यासी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : रोड, पश्चिमेस : स. नं. ४८९,
दक्षिणेस : प्लॉट नं. ६, उत्तरेस : प्लॉट नं. ४

येणे प्रमाणे चतु:सिमेतील प्लॉट मिळकतीचे मालक शोभाबाई धर्मराज दंडगव्हाळ यांचे मालकीची व ताबे उपभोगातील प्लॉट मिळकत आहे. सदरहू प्लॉट मिळकत ही निर्वेध व निर्बोज असल्याचे सांगून प्लॉट मिळकत मालकाने आमच्या अशिलांशी कायमस्वरुपी विक्रीच्या उद्देशाने साक्षीदारांसमक्ष सौदा करार केलेला असून बयाणा रक्कम घेतलेला आहे. लवकरच सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करणार इाहेत.

सबब वर नमूद प्लॉट मिळकतीत वर नमूद मालक व्यतिरिक्त इतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, अधिकार, हितसंबंध, गहाण, दान, टांच, जप्ती, कोर्ट केसेस, दावे इत्यादी हरकत अथवा तक्रार असल्यास १५ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. विहित मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत व तक्रार न आल्यास वर नमूद प्लॉट मिळकत ही निर्वेध व निर्बोज असल्याचे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. साहजिकच मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमच्या अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली असे. कळावे.
ठिकाण : धुळे दि. २५/०५/२०२६

**ॲड.शैलेश के. जिंदल**
३ अग्रवाल नगर, धुळे मो. ८८८८३३३७९५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ८६ पैकी प्लॉट नं. ७ चे एकूण क्षेत्र ४७८.६४ चौ. मी. यांस वि. सि. स. नं. ३६१७ चे एकूण क्षेत्र ६५१ चौ. मी. सत्ता प्रकार क यापैकी पुर्वे कडून दक्षिण दिशेच्या भागाचे क्षेत्र २९१.१३ चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ८, पश्चिमेस : प्लॉट नं. ७ पैकी भगा, दक्षिणेस : वापर व पुढे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३, उत्तरेस : प्लॉट नं. ७ पैकी भाग, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.वाल्मीक रघुनाथ खैरनार रा. ३०१, कलशनगर, प्लॉट नं. २४, आगरी कोळी संस्कृती भवन, सेक्टर २८, नेरुळ, नवी मुंबई ठाणे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहू मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, कब्जा पावती, रक्कम देणे/घेणे, कोर्ट वाद, सॉल्व्हन्सी, आरक्षण इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे असे समजून संबंधिता तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची जाहीर नोटीस पक्षकाराने नदिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.
धुळे दि. २५/०५/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

प्रकाश में आज
**अखरी बाजी**




शत्रुघ्न सिन्हा, मौसमी चॅटर्जी, गोविंदा, कृणाल गोस्वामी, मंदाकिनी

## शब्दकोडे क्रमांक : २३७४



**आडवे शब्द :** १. स्फूर्ती ३. प्रेक्षणीय स्थळ पाहण्यासाठी केलेला प्रवास ५. मनोदय ७. विचार ८. लांब ९. लेखणी १०. हिंदीत-नवी १२. तूज १४. ड्रायव्हर १७. इंग्रजीत-पैसे १८. फळाचा तुकडा २०. दिन २१. एक हिंदी सिनेमा बंटी और --- २३. हळूच २५. एक पालेभाजी २६. जेवणावळ २७. झेंडा ३०. संगीत सप्तकातील एक स्वर ३१. पतीची दुसरी पत्नी ३२. पाय ३३. बासुरी ३५. एक हिंदी वृत्त वाहिनी ३६. एखाद्या सारखे केलेले हावभाव ३८. चहापुडी ४०. सवय ४२. पचण्यास सुलभ ४५. रामदास स्वामी रचित --- चे श्लोक ४७. धोबी ४९. धनुष्य ५१. कारणीभूत ५३. उपवन ५४. रान ५५. हिस्सा ५६. मार्ग ५७. फुलांची पंखुडी **उभे शब्द :** १. माया-प्रीत २. रत्न ३. वापस ४. इंग्रजीत-स्पर्श ५. धनी ६. मन-उलट लिहा ९. केसांना रंग लावण्याची क्रिया ११. हिंदीत-चिंच १३. हिंदीत-वकालत १५. नवी १६. मुद्दाम १९. पाय २०. एक कडधान्य २२. ताकद २३. उदबत्ती २४. दाब २५. वरवंट्याचा जोडीदार २८. देश २९. एक हिंदी सिनेमा -- कहते हैं ३१. सर्व ३२. लोभ ३४. वाणी ३५. एक हिंदी सिनेमा --- सपना मनी मनी ३७. अलमारी ३९. संगीतातील एक राग ४१. बारा वर्षांचा काळ ४३. हाताचे शेवटचे बोट ४४. लहान पूल ४६. पलीकडे ४८. रांग ५०. आब ५१. गुलाबाच्या फुलाला असतो ५२. चहा पिण्याचे पात्र ५३.पाठीस आलेला वाकडेपणा

**शब्दकोडे क्रमांक : २३७३ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भ | री | त | | वि | ला | य | ती | | मा | घा | र |
| र | स | | स | का | ळ | | न | व | स | | स |
| डा | | प्र | या | स | | कु | | त | ळी | रा | म |
| | सं | ता | जी | | नि | वे | द | न | | म | |
| प | | प | | सं | | त | | दा | न | | क |
| र | ज | | प्र | वे | श | | ती | र | | ता | स |
| त | र | स | | द | | ना | स | | चा | क | र |
| | ब | | अ | ना | मि | का | | पा | क | | त |
| प्र | | खा | ट | | र | | पा | व | | सां | |
| सा | स | र | | सा | र | खा | | टा | र | झ | न |
| द | म | | ढ | ग | | प | र | | ब | | वा |
| | ज | ड | | र | डा | र | | का | र | वा | |






पान १ वरुन

## बेदरकार डंपर विरुद्ध बाजूच्या ट्रकला धडकला

होती की वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला. तीनही वाहनांमधील चालक, सहचालक, प्रवासी, टोलनाका कर्मचारी गंभीर जखमी झाले. अपघातानंतर घटनास्थळी प्रवाशांची एकच आरडाओरड किंकाळ्या सूरु होत्या.

### लळिंग ग्रामस्थांची मदत

आरडा ओरड एकूण लळिंग येथील ग्रामस्थांसह महामार्गावर जाणाऱ्या काही वाहन चालकांनी मदतीसाठी धाव घेतली. महामार्ग पोलीस तसेच टोल नाक्यावरील मदत पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना बाहेर काढण्यासाठी मोठे बचावकार्य राबविण्यात आले. गंभीर जखमींना उपचारासाठी धुळे येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालयात व खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, उप अधीक्षक राजकुमार उपासे, मोहाडी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील, उपनिरीक्षक किरण कोठावदे यांच्यासह पोलीस पथक दाखल झाले होते.

### गणेशवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

टोल कर्मचारी गणेश हिरामण थोरात (वय , रा. शेलारवाडी, चितोड रोड, धुळे) याच्या मृत्यूची बातमी समजताच चितोड रोड परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. गणेशच्या मित्रांसह नातेवाईकांनी रुग्णालयात एकच गर्दी केली होती. रुग्णालयातून आज दुपारी मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला. शेलारवाडी येथील निवासस्थानापासून त्याची अंत्ययात्रा निघाली. चितोड रोडवरील अमरधाम मध्ये शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार झाले. गणेशच्या मृत्यूने कुटुंबीयांसह नातेवाईक मित्रांनाही शोक अनावर झाला. गणेश थोरात याच्या मागे आई पतकी दोन मुले असा परिवार आहे.

### सहा जणांचा मृत्यू

या भिषण तिहेरी अपघातात सहा जण ठार झाले. त्यांची नावे अशी : ट्रक चालक मनोज प्रकाश नरवाळ (वय ४०, रा. टोकडे ता. मालेगाव जि. नाशिक), अमीर समीर कुरेशी (वय २९, रा. आनंदबेडी, पिंपरी ता. ठिकरी जि. बडवाणी), वाळू डंपर चालक योगेश पंडीत मंडलिक (वय ३४, रा. सोयगाव ता. मालेगाव), गुलमहंमद मझरुद्दीन शेख (वय २९, रा. पंचायतीवाडी राजपुर, जि. बडवाणी),ट्रॅव्हल्स चालक जावेद खान जहांगीरखान (वय ३९, रा. भिलखेडा राजपूर जि. बडवाणी), टोल कर्मचारी गणेश हिरामण थोरात (वय , रा. शेलारवाडी, चितोड रोड, धुळे).

### जखमींची नावे

अपघातात सुमारे जण जखमी झाले, त्यांची नावे अशी (कंसात वय) : सुरभी महाजन (३२), शिवाय महाजन (९), दीपक वाळके (२६), सपना महाजन (४०), अनीता वाळके (४५), विजय सिंह (५५), तबरीश अन्सारी (४५), सपना दिवाण (३५), इमरान खान (३५), भावना हटकर (२८), हुसेना (३२), सामिन सैयद (४५), शकीला सैयद (५०), सैयद अयुब (४५), शैलेश आक्या (२२), जेबान अली (५८), मुस्कान खान (२२), अनिल वर्मा (५३), अरविंद जैन (४७), अजय कुमार (२६), सईद मोहम्मद (३१), अंकित राजपूत (२४), अभिजीत आपटे (२५), कनक सोनी (१९), संगीता सोनी (४७) यांचा समावेश आहे.

### टोल कर्मचाऱ्यांचे आंदोलन

लळींग येथे अपघातस्थळी मदतकार्य करताना लळिंग टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांचा अपघात झाला. अपघातात गणेश हिरामण थोरात (वय ३०, रा. शेलारवाडी, चितोड रोड, धुळे) याचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच

संतप्त कर्मचाऱ्यांनी लळिंग टोल नाक्यावर आंदोलन सुरू केले. त्यामुळे टोल वसुली काही काळ बंद पडली. आम्हाला कोणतीही सुरक्षा नाही, विमा संरक्षण नाही, तरीही आम्ही जीव धोक्यात घालून अपघातग्रस्तांना मदत करतो. आमच्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आवश्यक सुविधा, सुरक्षा पुरवावी, सुविधा उपलब्ध नसल्याचा आरोप करीत कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. या आंदोलनामुळे महामार्गावर वाहतूक ठप्प झाली होती. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मोहाडी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील यांच्यासह पोलीस घटनास्थळी तळ ठोकून होते. अधीक्षक विशाल आनंद यांनीही आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची समजूत काढली.

### वाहतूक ठप्प

अपघात झाल्यानंतर अपघातग्रस्त वाहने महामार्गावरच विखुरली होती. त्याचवेळी टोलनाक्यावर ही कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू होते. त्यामुळे महामार्गावर लळिंग घाटात दोन्ही बाजूने दोन ते अडीच तास वाहतूक ठप्प झाली होती. आर्वी आणि अवधानपर्यंत दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहने बाजूला करत काही वेळाने वाहतूक सुरळीत केली.

## पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीतून जनतेची फक्त लुट

पेट्रोलियमउत्पादनांवरील कर आणि उत्पादन शुल्काच्या माध्यमातून जनतेच्या खिशातून ४३ लाख कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. मागील चार पाच दिवसात केलेल्या चार रुपयांच्या दरवाढीतून भारत पेट्रोलियम, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन, या कंपन्यांनी काही तासांतच बाजारातून बारा हजार ४०० कोटींची कमाई केली. ही नफेखोरी जनतेच्या खिशावर दरोडा टाकून केलेली आहे. काँग्रेस सरकारच्या वेळी एक-दोन रुपयांनी पेट्रोल दरवाढ झाली की भाजपाचे नेते रस्त्यावर बोंबा मारत होते. मग, आता महागाईवर गप्प का, असा प्रश्न सपकाळ यांनी केला.

### भाजपा नेत्यांचा निर्लज्जपणाचा कळस

राज्यात पेट्रोल-डिझेलचा साठा मुबलक आहे, असा दावा भाजपा सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहेत. साठा असेल तर राज्यातील विविध भागात पंपावर रांगा का लागल्या आहेत? यावरील भाजपा नेत्यांचे उत्तरही अत्यंत हास्यास्पद आहे. पेट्रोल डिझेलचा साठा केल्याने टंचाई निर्माण होत आहे, असे अत्यंत बेजबाबदार व अत्यंत निर्लज्जपणाचे विधान भाजपाचे नेते करत आहेत. हे विधान जबाबदारीपासून पळ काढणारे व जनतेच्या डोळ्यात धुळफेक करणारे आहे. जनता मुर्ख नाही, हे भाजपाच्या नेत्यांनी लक्षात ठेवावे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

### जनतेत तीव्र संताप

नरेंद्र मोदी सरकारने केलेल्या पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीवर जनतेत तीव्र संताप आहे. सरकारने ही दरवाढ मागे घ्यावी या मागणीसाठी व जनतेची सुरु असलेली लूट थांबवावी यासाठी काँग्रेस पक्ष आणि पक्षाच्या विविध आघाड्यांच्या माध्यमातून उद्या पासून (दि.२६) प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन होईल, असेही प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी सांगितले.

## पोलिस मुख्यालयात स्फोट चार प्रशिक्षणार्थी जखमी

उपस्थित कर्मचारी आणि अधिकारीही काही काळ गोंधळून गेले. या दुर्घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत. यातील दोन जणांच्या हाताच्या बोटांच्या चिंधड्या उडाल्याची माहिती समोर आली आहे. इतर दोघांना किरकोळ दुखापत झाली असली तरी स्फोटाच्या तीव्रतेमुळे सर्वांनाच मोठा मानसिक धक्का बसला आहे. घटनेनंतर जखमी कर्मचाऱ्यांना तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. दरम्यान, राखीव पोलिस निरीक्षक उमेश परदेशी यांनी या घटनेबाबत प्राथमिक माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, जमाव नियंत्रणासाठी वापरल्या जाणाऱ्या स्मोक हँडग्रेनेडचे प्रशिक्षण सुरू होते. संबंधित जवानाने ग्रेनेडची पीन काढल्यानंतर लिव्हर हातातून सुटल्याने हा अपघाती स्फोट झाला.

पान १ वरुन

## आता नवतप सुरू झाला, नऊ दिवस उष्णलाट

वेळी प्रचंड उकाडा, उष्ण वारे आणि अंगाची लाही लाही करणारे ऊन यामुळे नागरिक हैराण होतात. तब्बल नऊ दिवस ही परिस्थिती कायम राहते. त्यामुळे याला नवतप म्हटले जाते.

### नवतपाचा शरीरावर परिणाम?

या वाढत्या उन्हामुळे हिट स्ट्रोक, अशक्तपणा, चक्कर येणे आणि डिहायड्रेशनचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने थकवा डोकेदुखी आणि बेचैनी जाणवू शकते. या काळात लहान मुलं वृद्ध व्यक्ती आणि बाहेर काम करणाऱ्यांना याचा सर्वाधिक त्रास जाणवू शकतो.

### नवतपापासून बचाव कसा कराल?

नवतपाच्या दिवसात दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडणे टाळावे. बाहेर जाताना डोक्यावर टोपी स्कार्प किंवा छत्रीचा वापर करावा. शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये म्हणून भरपूर पाणी, ताक, लिंबू पाणी आणि इतर द्रव पदार्थांचे प्रमाण वाढवा. हलका आणि पचायला सोपा आहार घ्या. जास्त वेळ उन्हात काम करणे टाळल्यास उष्माघातापासून वाचणे सोपे जाईल.

नवतपा संपल्यानंतर काय?

नवतप संपल्यानंतर हवामान बदलास सुरुवात होते. या नऊ दिवसानंतर मोसमी पावसासाठी पोषक वातावरण तयार होतेआणि उष्णतेपासून दिलासा मिळतो.

## दिंडोरीचे विश्वनाथ महाराजांना कान्हदेश वारकरी भुषण पुरस्कार

भजन तसेच वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रासह गुजरात राज्यातील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार आणि वारकरी संप्रदायातील मान्यवर या सोहळ्यात सहभागी झाले होते.

दि. २४ मे रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत भव्य वारकरी पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यंदाचा कान्हदेश वारकरी भूषण पुरस्कार दिंडोरी (जि. नाशिक) येथील ह.भ.प. विश्वनाथजी महाराज कोल्हे यांना धुळे शहराचे आमदार अनुप भैय्या अग्रवाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच संत मुक्ताई-जनाई महिला पुरस्कारांचे वितरण धुळे शहराच्या महापौर सौ. मायादेवी महादेव परदेशी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना आमदार अनुप अग्रवाल यांनी सांगितले की, गेल्या वेळेस मी शब्द दिला होता की वारकरी भवन बांधणार. त्यासाठी धुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी जागेची पाहणी करण्यात आली असून, लवकरच जागा उपलब्ध होणार आहे. जागा मिळाल्यानंतर तातडीने कामास सुरुवात करून भव्य असे वारकरी भवन उभारण्यात येईल.

यावेळी माजी नगरसेविका वंदना विक्रम थोरात, नगरसेविका शितल राहुल पाटील तसेच कान्हदेश वारकरी सेवा मंडळाच्या महिला अध्यक्षा ह.भ.प. शोभाताई खैरनार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी धुळे, नंदुरबार, नाशिक, पुणे, जळगाव, नगर तसेच गुजरात राज्यातील ज्येष्ठ, युवा आणि महिला वारकऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष सुधाकर विठ्ठल भोकरे, उपाध्यक्ष हिरामण गवळी, कार्याध्यक्ष डॉ. भास्कर लक्ष्मण पाटील तसेच सचिव सुनील भालचंद्र वाघ

सप्ताह समिती अध्यक्ष यशवंत पाटील, कैलास पवार, प्रकाश विभाडिक, आर. जी. पाटील, रविंद्र धनगर, कांतीलाल सोनार, प्रविण पाटील, नारायण पाटील, विश्वनाथ चौधरी, महाविर सरग, उमेश नेरकर, संजय पाटील अर्थेकर, शहर अध्यक्ष सोनवणे नाना, राजू पाटील, विनोद मनोरे यांनी परिश्रम घेतले.

## आगामी काळात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नायक कारभारी परिषद

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, राज्यमंत्री जयकुमार रावल, ओबीसी बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आरोग्यदूत रमेश्वर नाईक, माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित, आमदार मंगेश चव्हाण, आमदार राजेश पाडवी, माजी आमदार कुणाल पाटील, आमदार राम भडाणे यांच्यासह खानदेशातील विविध आमदार-खासदार उपस्थित राहतील, अशी माहिती देण्यात आली.

तसेच समाजामध्ये जनजागृती अभियान राबविण्यात येणार असून प्रत्येक घरावर स्टिकर लावून जनजागृती केली जाणार असल्याचेही सांगण्यात आले. ११ जून रोजी धुळे येथे व्यापक स्वरूपाची बैठक होणार असल्याची माहिती श्रावण चव्हाण यांनी दिली.

बैठकीस उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये धुळे जिल्हाध्यक्ष अनिल पवार, युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष दिनेश जाधव, नंदुरबार जिल्हाध्यक्ष रजनीत चव्हाण, कार्याध्यक्ष शिवाजी चव्हाण, सहअध्यक्ष मेहता जाधव, भूपेंद्र राठोड, जिल्हा आश्रयदायी सदस्य प्रेम चव्हाण तसेच जळगाव जिल्ह्यातील भाजप युवा नेते शालिक पवार, किरण जाधव, गोविंद राठोड, अंकुश पवार, सोमा राठोड, दिनेश राठोड, विजय राठोड, दयाराम पवार, पुरुषोत्तम चव्हाण आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवाजी चव्हाण यांनी मानले.

## तेली समाज मंडळाचा सारथी पुरस्कार वितरण

अध्यक्ष कमलाकर (गुड्डूभाऊ) अहिरराव, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सतीश महाले, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस युवराज करनकाळ, मजुर फेडरेशनचे राजेंद्र महाले, बबन थोरात, विनोद राजू चौधरी यांच्यासह उत्तर महाराष्ट्रातील तेली समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते,या समारंभाला तेली समाजातील सर्व समाजसेवक बंधू भगिनींनी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यातील तेली समाजामध्ये उत्कृष्ट कार्य करणारे,समाज प्रबोधन करणारे,समाजाला संघटित करणारे अनेक कार्यकर्ते आहेत.मात्र,विशेष कार्य करून देखील प्रसिद्धीपासून लांब राहतात असे निवडक अकरा लोकांना निवडून त्यांना दर पाच वर्षांनी समाज सारथी हा पुरस्कार देण्यात येतो.यावर्षी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांमध्ये रामेश्वर चौधरी (वरखेडी),वंदना चौधरी (सोनगीर),सुभाषघाटे(नागपूर),सुनीलचौधरी(धरणगाव),रूपाली चौधरी (पिंपळनेर),निर्मला चौधरी (जळगाव),चंद्रकांत चौधरी (धुळे),रमेश गवळी (कोपरगाव),शशिकांत चौधरी (धुळे),राजेंद्र चौधरी (मालेगाव),सुरेश चौधरी (चाळीसगाव) यांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून पुरस्कारामध्ये आकर्षक असे सन्मानचिन्ह,मानवस्त्र,मानपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात येईल तसेच सन्मानित होणाऱ्या सर्व नगरसेवकांना सन्मानचिन्ह व मानवस्त्र देण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी अनेक दिवसांपासून प्रयतक करीत होते.

उत्तर महाराष्ट्रातील सर्व नगरसेवकांना एकत्र करून त्यांचा सन्मान करण्याची ही तेली समाजातील पहिलीच वेळ असून या अभूतपूर्व अशा सोहळ्यासाठी उत्तर महाराष्ट्रातील सर्व तेली समाजातील बंधू भगिनींनी उपस्थित रहावे असे आवाहन खान्देश तेली समाज मंडळाच्या वतीने अध्यक्ष कैलास आधार चौधरी,सचिव रवींद्र जयराम चौधरी,कार्याध्यक्ष मनोज मधुकर चौधरी,विभागीय उपाध्यक्ष राजेंद्र माधवराव बागुल,धुळे शहर अध्यक्ष राजेंद्र भटू चौधरी,शहर सचिव किशोर पुंडलिक चौधरी,जळगाव जिल्हा अध्यक्ष सोनू भटू चौधरी,उपाध्यक्ष जयवंत रामदास चौधरी,किरण श्रीराम बागुल,भाऊसाहेब चौधरी,खजिनदार छोटू श्रावण चौधरी,धुळे तालुका अध्यक्ष सुनील भारत चौधरी,सचिव पंकज संतोष चौधरी,चाळीसगाव अध्यक्ष सुनील भिवसन चौधरी,अरुण भगवान चौधरी,युवक आघाडी अध्यक्ष सुनील दिलीप चौधरी,अतुल सुरेश वाघ,गजानन एकनाथ चौधरी,नितीन मोतीलाल चौधरी,प्रमोद महादू चौधरी,नटराज बाबूलाल चौधरी, राजेंद्र भाईदास चौधरी,अमोल हिरामण चौधरी,शाम रामदास चौधरी,कैलास रतन बोरसे यांच्यासह उत्तर महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## शहाद्यात जनगणना संथगतीने प्रगणक पोहचले नसल्याची माहिती

**शहादा,दि.२५(का.प्र.) - केंद्र सरकारच्या वतीने देशात राष्ट्रीय जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्याला मोठ्या उत्साहात प्रारंभ करण्यात आला आहे. या मोहिमेत येत्या दि. ३१ मे पर्यंत प्रत्यक्ष घरोघरी जाऊन जनगणना करण्याचे आदेश आहेत. मात्र, शहादा शहरातील नगरपालिका हद्दीत राहणाऱ्या अनेक नागरिकांकडे अद्याप एकही प्रगणक किंवा बीएलओ पोहोचला नसल्याची धक्कादायक वस्तूस्थिती समोर आली आहे. या गंभीर बाबीबाबत नगरपालिका प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयतक केला असता त्यांच्याकडून कोणतीही समाधानकारक माहिती मिळू शकलेली नाही.**

मिळालेल्या माहितीनुसार तहसील प्रशासनामार्फत या राष्ट्रीय कामासाठी महसूल, नगरपालिका आणि शिक्षण क्षेत्रातील बीएलओंची प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.पहिल्या टप्प्यात दि.१ ते १५ मे या कालावधीत नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने आपली माहिती पोर्टलवर दाखल केली होती.दुसरा टप्पा दि.१६ ते ३१ मे पावेतो असून या १५ दिवसांच्या कालावधीत प्रगणकांनी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन नागरिकांकडून सुमारे ४० प्रश्नांची उत्तरे भरून घेणे आवश्यक आहे.आश्चर्याची बाब म्हणजे, शहादा तालुक्यातील ग्रामीण भागात जनगणनेचे काम सुमारे ८० टक्क्यांपेक्षा अधिक पूर्णत्वास आले आहे. मात्र शहादा शहरात दुसरा टप्पा सुरू होऊन एक आठवड्या पेक्षा जास्त काळ उलटून गेला तरी अनेक प्रभागांत अद्याप प्रगणकांचे दर्शनही झालेले नाही.शहरात निश्चित किती प्रमाणात काम झाले आहे, याची अधिकृत माहिती जाणून घेण्यासाठी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयतक केला असता, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे शहरी भागात जनगणनेचे काम नेमके सुरू आहे की नाही? आणि झाले असल्यास ते किती प्रमाणात झाले? याबाबत कोणतीही अधिकृत माहिती मिळू शकलेली नाही. आमच्या गल्लीत किंवा प्रभागात अद्याप कोणीही जनगणनेची माहिती घेण्यासाठी आलेले नाही. दि.३१ मे ही अंतिम तारीख असताना प्रशासन एवढे सुस्त का आहे? असा सवाल स्थानिक नागरिकांकडून विचारला जात आहे.अंतिम मुदत संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिले असताना शहादा शहरातील ही संथ गती चिंतेची बाब ठरत आहे. त्यामुळे या प्रकरणी तहसीलदार आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, तसेच संबंधित प्रगणक व नगरपालिका प्रशासनाला युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश द्यावेत, अशी तीव्र अपेक्षा शहादा शहरातील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## कुकडेलला पो.चौकी द्यावी माधवी पाटीलांची मागणी

शहादा, दि.२५(का.प्र.) - शहादा शहरातील कुकडेल परिसराचा झालेला चौफेर विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसाठी व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कुकडेल भागात तातडीने स्वतंत्र पोलीस चौकी कार्यान्वित करण्यात यावी, अशी आग्रही मागणी शहादा नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष सौ. माधवीताई मकरंद पाटील यांनी केली आहे. या संदर्भातील एक सविस्तर निवेदन त्यांनी नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आणि शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना दिले आहे.

## कचरा संकलन गैरव्यवहारात प्रशासनही सहभागी; गुन्हा दाखल करा- शिवसेना

**धुळे, दि.२५- शहरातल कचऱ्याचे संकलन करतांना त्यात माती, दगड टाकून मोजमाप केले जाते. त्याआधारावर महापालिकेतून पैसे घेतले जातात. गैरमार्गाने पैसे मिळवणाऱ्या पुण्यातील भाग्यदीप्स वेस्ट मॅनेजमेंट या कंपनीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच या कृत्यात सहभागी असणाऱ्या मनपातील अधिकारी कर्मचारी यांच्यावर देखील चौकशीअंती गुन्हा दाखल करण्यात यावा. अशा मागणीचे निवेदन शिवसेना उबाठाच्या पदाधिकारी, कर्मचाऱ्यांनी शहर पोलीस स्टेशन आवारात घोषणाबाजी करून दिले.**

मनपाने कचरा संकलनाचा ठेका पुण्यातील भाग्यदीप कंपनीला अठरा कोटी रूपयांना दिला. शहरातील ओला व सुका कचरा संकलीत करून तो शहराबाहेर कचरा डेपोवर टाकण्यासाठी कंपनीनी शंभर घंटागाड्या, छत्तीस ट्रॅक्टर, एक पोकलॅण्ड, डंपर अशी वाहने वापरणे बंधनकारक केले आहे. कंपनीने दिवसभरात २०८ टन कचरा संकलित करावा अशी अट आहे. मात्र कचरा डेपोवर दररोज २६० ते २७० टन कचरा येत असल्याची नोंद केली जाते. त्यानुसार ठेकेदाराला पैसे दिले जातात. संकलित करण्यात आलेल्या कचऱ्यातून माती, दगड आणले जात असल्याचे सबळ पुरावे मनपाकडे सुपूर्द केले असतांना कोणतीही कारवाई केली जात नाही. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा. या मागणीसाठी घोषणाबाजी करत पोलीस प्रशासनाला निवेदन देतांना शिवसेनचे अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी, धिरज पाटील, संदीप सुर्यवंशी, तेजस गोटे, कुणाल कानकाटे, निंबा मराठे, शिवाजी शिरवाळे, पंकज भारस्कर, सचिन कोळेकर, छोटू गवळी, प्रशांत ठाकूर उपस्थित होते.

जी.के. आर्केड या रिअल इस्टेट प्रोजेक्टसाठी
सेल्स प्रतिनिधी पाहिजेत
GK ARCADE Shops & Luxurious Flats
नकाणे रोडवरील फ्लॅट, शॉप्स व बोरकुंड व आर्वी येथील प्लॉटींग ले-आऊट च्या विक्रीसाठी आम्हाला कष्टाळू आणि महत्त्वाकांक्षी सेल्स प्रतिनिधींची गरज आहे.
प्रॉपर्टी ब्रोकर्स आमंत्रित
आकर्षक कमिशन मिळवण्याची सुवर्णसंधी!
रिअल इस्टेट क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी...
पात्रता: कोणत्याही शाखेचा पदवीधर, ग्राहकांशी उत्तम संवाद साधण्याची कला अवगत असावी. रिअल इस्टेट किंवा कोणत्याही मार्केटिंग क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य, स्वतःची दुचाकी असणे आवश्यक.
आजच संपर्क साधा! जी.के.आर्केड संपर्क : 88881 92677 94227 92677

नर्स पाहिजे
बायपास झालेल्या महिला पेशंटसाठी १५ दिवसांसाठी शुश्रुषा करायला अनुभवी नर्स पाहीजे.
- संपर्क -
9422706111

पाहिजे
Ram Academics ऑफिस जॉब Intership साठी मुलं-मुली पाहिजे. Ms Word, Excel, PPT, Laptop पुर्ण येणे व English चांगले येणे आवश्यक. Freshers चालतील.
अशोका स्टेट, 2nd फ्लोर, संतोषी माता मंदिर, धुळे
Whatsapp Call
7666272545
9022552545

पाहिजेत
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

फ्लॅट विकणे आहे
देवपुर परिसरातील विघ्नहर्ता कॉलनी येथे साईप्रित अपार्टमेंट मध्ये फ्लॅटस् विकणे आहेत.
-: संपर्क :-
9822197130

पाहिजेत
FMCG Distributor मध्ये डिलिव्हरीसाठी इंग्रजी वाचता लिहता येणारे डिलिव्हरी बॉय, ड्रायव्हर पाहिजेत.
पत्ता - अग्रसेन चौकजवळ, धुळे
8767674975

पाहिजे
कंपाऊंडर, नर्स, किरकोळ कामासाठी मुलगा पाहिजे.
पार्ट/फुलटाईम.
डॉ.आनंद गिंदोडिया
श्री.धन्वंतरी हॉस्पीटल
गल्ली नं.४, महात्माजी हॉटेल समोर
9112159675

वीर सावरकर जयंती निमित्त शुभारंभ
वीर सावरकर अपार्टमेंट
फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.
फ्लॅट एरिया :- 1 BHK - 1000 स्के.फुट, 2 BHK - 1200 स्के.फुट, 3 BHK - 1350 स्के.फुट
बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

अनारसे
खास अधिक मासा साठी उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील
नोंदणी आवश्यक आहे.
अनारसा पिठ उपलब्ध आहे.
मदर्स किचन
फूलवाला चौक,धुळे
9049902201
7887750864

ड्रायव्हर पाहिजे
कार चालविण्यासाठी अनुभवी कायमस्वरूपी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
-: संपर्क :-
9823178279

पाहिजेत
हॉटेलसाठी
मॅनेजर - ०१
कारागीर - ०१
वेटर - ०२
कॅप्टन - ०१
लावणे आहे.
8805589555

आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...
atomberg "Why not?"



क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे ३* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है!
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक अ‍ॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०